नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 28/08/2021 (शनिवार)
(दुपार)

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. मौदाः– अंतर्गत 12 कि. मी. अंतरावरील आंबाडी ते सेलु रोड येथे दिनांक 27/08/2021 चे 18.45 वा. दरम्यान मौदा पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन मौदा पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. एच.–40/बीएल–8419 क्रमांकाच्या ट्रकला थांबवुन तपासले असता सदर वाहनात आरोपी नामे– कमाल अहमद मोहम्मद जलील, वय– 41 वर्षे, रा. वारीसपुरा, कामठी, जि. नागपुर याच्या ताब्यातुन 27(बैल, गाय गोरे) जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण किंमती 19,74,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस नाईक श्री. मनिराम भुरे, पो.स्टे. मौदा यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11 (1)(डि) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5 अ, 9 प्राणी सरंक्षण कायदा, तसेच कलम 184 मोवाका काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार मनोहर जंगवाड 8329948101 हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन मौदाचे ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री हेमंत खराबे यांचे नेतृत्वात पोलीस हवालदार मनोहर जंगवाड, पोलिस नाईक मनिराम भुरे, पोलिस शिपाई शिवाजी नागरे, जितेन्द्र बोरकर यांनी यशस्वीरित्या पार पाडली.






पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर